आमदार वानखेडे यांनी अधिवेशनात दिलेला शब्द पाळावा !
>> पान 2

वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज
>> पान 3

जिल्हा परिषदेत 'कृषी दिन' उत्साहात साजरा
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
आपले विचार सकारात्मक ठेवा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



कोल्हापुरातील युवा दिग्दर्शकाच्या स्वीट मूनला जर्मनीत सर्वोत्कृष्ट लघुपटाचे मानांकन
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 291 ■ गुरूवार, दि. 03 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## अखेर मंत्र्यांना मर्जीतले खासगी सचिव नाहीच!

### दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतरही पदरी निराशाच

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर महायुती सरकारमध्ये मंत्र्यांना शपथविधी झाल्यानंतर खातेवाटप करण्यात आले. मात्र, आता खातेवाटप झाल्यानंतर मंत्र्यांना अद्याप मर्जीतले खासगी सचिव न नेमल्याने दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर महायुती सरकारमध्ये मंत्र्यांच्या पदरी निराशाच आली असल्याचे बघायला मिळाली आहे. पुढे आलेल्या माहितीनुसार जीएडीच्या नोटीसीनंतर मर्जीतल्या खासगी सचीव मिळावा यासाठी मंत्र्यांकडून लॉबिंग केली जात होती. मात्र दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर मंत्री आणि खासगी सचिव यांच्या पदरी निराशाच पडली असल्याची माहिती समोर आली आहे.**

दरम्यान, जीएडी कडून नोटीस आल्यानंतर खासगी सचीव मूळ विभागात सुरू होण्यास सुरुवात केली जाते. मात्र नोटीसमध्ये बेकायदेशीररित्या मंत्र्यांकडे केलेल्या कामाबाबतचा खुलासा या खासगी सचिवांना करण्यास सांगण्यात आले होत. दरम्यान, सामान्य प्रशासन विभागाकडून एकूण ३२ जणांना मूळ विभागात रुजू होण्यासंदर्भात नोटीसा काढल्या असून त्यात शिवसेनेच्या ५ तर राष्ट्रवादीच्या २ मंत्रांच्या खासगी सचिवांचे समावेश असल्याची माहिती पुढे आली आहे.

एकीकडे दोन महिन्यांचा काळ लोटल्यानंतरही महाराष्ट्रातील महायुती सरकारमधील युती भागीदार भाजप राष्ट्रवादी आणि



शिवसेनेतील अंतर्गत कलह मिटण्याची चिन्हे दिसत नाहीत. मुख्यमंत्री कार्यालयाकडून विलंब आणि आक्षेपांमुळे शिवसेनेच्या मंत्र्यांच्या खाजगी सचिवांच्या प्रलंबित नियुक्त्यांवरून नवीन तणाव निर्माण झाला आहे. त्यातच यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकारमधील सात मंत्र्यांना ओएसडी आणि पीए नियुक्त करण्यासाठीची परवानगी नाकारली होती. हा विषय अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. परंतु, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाकडून पुन्हा एका मंत्र्यांचे पीए म्हणून कार्यरत असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ विभागात रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हा आदेश मिळाल्यानंतरही मूळ विभागात हजर न झाल्यास संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल. असा इशारा ही देण्यात आला होता.

महाराष्ट्रातील महायुती सरकारमधील युती भागीदार भाजप आणि शिवसेनेतील अंतर्गत कलह मिटण्याची चिन्हे दिसत नाहीत. मुख्यमंत्री कार्यालयाकडून विलंब आणि आक्षेपांमुळे शिवसेनेच्या मंत्र्यांच्या खाजगी सचिवांच्या प्रलंबित नियुक्त्यांवरून नवीन तणाव निर्माण झाला आहे. >> पान २

## कल्याणमधून १३०० किलो गोमांस जप्त

**मुंबई/प्रतिनिधी :** कल्याण पोलिसांनी केलेल्या एका महत्त्वाच्या कारवाईमध्ये गोमांसाची तस्करी करणाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये पोलिसांनी १३०० किलो गोमांस जप्त केलं आहे. विशेष म्हणजे गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली असून या माध्यमातून एक मोठं रॅकेट समोर येण्याची शक्यताही नाकारता येत नाही असं सांगितलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण तालुका पोलिसांना एक गुप्त बातमीदार व बजरंग दालाच्या कार्यकत्यांकडून माहितीच्या आधारे गोमांस तस्करीसंदर्भात कारवाई केली. एका वॅगनआर गाडीने गोमांस घेऊन जाणार असल्याची टीप पोलिसांनी मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी कल्याण तालुक्यातील रायता नदीच्या पुलाजवळ आणे-भिसोळ रोडवर सापळा रचून येथून जाणारी सर्व वाहने थांबून तपासणी सुरु करण्यात आली. यावेळी तपासणीदरम्यान पोलिसांना वॅगनआर कार क्रमांम एम. एच ०५ ई.व्ही ७८६१ या गाडीला थांबवलं. ५६ वर्षीय जलाउद्दीन करीम शेख हा मूळचा अंबरनाथमधील उळनचाळ कार चालवत होता. या वॅगनरची तपासणी केली असता त्यामध्ये गोमांस आढळून आलं.

## गणेशोत्सवाआधी पश्चिम रेल्वेचा मोठा निर्णय, मुंबईतून या मार्गावर विशेष रेल्वे!

**मुंबई/प्रतिनिधी :** गणेशोत्सव आणि पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पश्चिम रेल्वेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांचा सुखकर प्रवासासाठी मुंबई-भुसावळ दरम्यान गाड्यांच्या फेऱ्यात वाढ करण्यात आली आहे. प्रवाशांची वाढती मागणी आणि गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दादर - भुसावळ विशेष रेल्वेगाडीच्या सेवा सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आल्या आहेत.

असं असेल वेळापत्रक

गाडी क्रमांक ०९०५१ ही दादर-भुसावळ त्रै-साप्ताहिक विशेष गाडी ३० जूनपर्यंत मर्यादित होती. आता या गाडीचे वेळापत्रक ३ जुलैपासून २९ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आले आहे. ही गाडी आता दर सोमवार, बुधवार आणि शनिवारी दादरहून भुसावळकडे धावणार आहे.

गाडी क्रमांक ०९०५२, भुसावळ-दादर त्रै-साप्ताहिक विशेष गाडी सुद्धा याच कालावधीत दर सोमवार, बुधवार आणि शनिवारी भुसावळहून दादरकडे धावेल. या दोन्ही विशेष गाड्यांची प्रत्येकी ३९ फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले असून, एकूण ७८ फेऱ्या चालवण्यात येणार आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर प्रवासी वाहतूक होते. त्यातच पावसाळ्यात नियमित गाड्यांवर ताण येतो. त्यामुळे या अतिरिक्त फेऱ्यांमुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि वेळेत होण्यास मदत होणार आहे. रेल्वे प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत असून, प्रवाशांसाठी ही मोठी दिलासादायक बातमी आहे.

## यवतमाळमध्ये मोठा शस्त्रसाठा जप्त

**यवतमाळ/प्रतिनिधी :** जिल्ह्यात अवैध शस्त्रसाठ्याच्या विरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत दोन ठिकाणी छापे टाकून दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत पाच अग्निशस्त्रे, धारदार तलवार, ३५० जिवंत काडतुसे, बुलेटप्रूफ जॅकेटसह एकूण १२ लाख ८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवायांमुळे शहरात खळबळ उडाली आहे. पहिल्या घटनेत रणवीर वर्मा (३०, रा. दर्डा नगर, यवतमाळ) हा पांढरकवडा रोडने मोपेडने जात असताना पोलिसांनी त्याला अडवून झडती घेतली. त्याच्याकडील पोत्यात पाच अग्निशस्त्रे, ३५० जिवंत काडतुसे, एक तलवार, बुलेटप्रूफ जॅकेट व इतर साहित्य आढळून आले. या कारवाईत सात लाख ७८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

## गुन्हेगारांविरोधात जलद कारवाईसाठी नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी : मुख्यमंत्री

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गुन्ह्यांच्या तपासात गतिमानता आणण्यासाठी नवीन फौजदारी कायदे उपयुक्त आहेत. या कायद्यांअंतर्गत डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर अपेक्षित असून न्याय प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक अधिसूचना व आदेश जारी करून कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी दिले. तसेच राज्यात नवीन फौजदारी संहिता कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभागनिहाय कामाचे रँकिंग करण्याच्या सूचनाही दिल्या.

विधानभवन येथे नवीन फौजदारी संहिता कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत आढावा घेताना मुख्यमंत्री श्री फडणवीस बोलत होते. बैठकीला गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नवीन फौजदारी संहिता कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. न्यायवैद्यक विभागाने गुन्हे सिध्दतेसाठी पुराव्यांच्या >> पान २

## पुढील शंभर वर्षाचा विचार करुन प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करा

### अजितदादांची अधिकाऱ्यांना तंबी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून राज्यात सुरु असलेल्या विकासप्रकल्पांच्या उभारणीसाठी केंद्र सरकारचे संपूर्ण सहकार्य मिळत आहे. राज्याच्या विकासाची ही कामे पुढील शंभर वर्षाचा विचार करुन आखावीत. नियोजित वेळेत पूर्ण करावीत. सर्व कामे दर्जेदार असतील याची काळजी घ्यावी. केंद्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय, संपर्क ठेवून पंधराव्या वित्त आयोगाचा सर्व निधी वेळेत उपलब्ध होईल आणि चालू आर्थिक वर्षअखेर खर्च होईल, यादृष्टीने कार्यवाही करावी. राज्याच्या विकासासाठी मिळणारा एक रुपयाचा निधीही परत जाणार नाही, याची काळजी घ्या, असे स्पष्ट निर्देश



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त, नियोजन व उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून राज्यात सुरु असलेल्या विविध विकास प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. >> पान २

## सरकारी कार्यालयात बर्थडे केक कापणं गुन्हा?

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** सरकारी कार्यालयं, सरकारी नोकरी याबाबत अनेकांनाच अनेकदा अप्रूप वाटत असतं. कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनापासून ते अगदी त्यांना मिळणारी विविध प्रकारची मुभा ही अप्रूप वाटण्याची काही कारणं. पण, याच सरकारी कर्मचाऱ्यांना आता म्हणजे एका महत्त्वाच्या नियमाचं पालन करावं लागणार आहे.

हा नियम आहे वाढदिवस साजरा करण्यासंदर्भात. सहसा सरकारी कार्यालय असो किंवा एखादं खासगी कार्यालय, तिथं एखाद्या सहकाऱ्याचा वाढदिवस असल्यास तो सर्वांसमवेत साजरा करण्यालाच अनेकजण प्राधान्य देतात. मात्र सरकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना यापुढं असं करता येणार नाही.

शासकीय कार्यालयात काही अधिकारी व कर्मचारी वाढदिवस साजरा करत असल्याचं निदर्शनास आलं तर थेट कारवाई करण्याचा इशारा शासनाने दिला आहे. मध्यंतरी जिल्हा बँकेचं एक पथक कर्जवसुलीसाठी फिरत असताना बँकेचे काही कर्मचारी वाढदिवस साजरा करण्यासाठी कामकाजाच्या वेळेत हॉटेलमध्ये गेल्याच्या अनेक तक्रारी आल्या होत्या. परिणआमी आता यापुढे कार्यालयीन वेळेत वाढदिवस अथवा वैयक्तिक समारंभ साजरा केल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे.

नियम काय सांगतो?

महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ नुसार ही कारवाई केली जाणार असल्याचा आदेश शासनाकडून बजावण्यात आला आहे. त्यामुळे सर्वच शासकीय आस्थापनांनी या कायद्याची अंमलबजावणी करायला सुरुवात केली



आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९, हा महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी लागू केला आहे. हा नियम शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर आणि कामकाजावर नियंत्रण ठेवतो. या कायद्यानुसार कर्मचाऱ्यांना कर्तव्ये, अधिकार आणि आचारसंहितेचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सर्वच शासकीय कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी हा कायदा लागू असल्याचच इथं स्पष्ट होत आहे.

## नशिब बलवत्तर म्हणून बचावला; वाहून गेलेला दुचाकीस्वार पाण्यातून बाहेर निघाला

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली/प्रतिनिधी :** पावसाळ्यात पुलाच्या पाण्यावरुन जात असताना वाहून जाण्याच्या घटना सातत्याने समोर येतात. राज्यातील विविध जिल्ह्यात नद्यांना पूर आल्यानंतर अतिधाडस करुन दुचाकी, चारचाकी वाहनासह पाण्यातून जीवघेणा प्रवास करणारे अनेक व्हिडिओ देखील पाहायला मिळतात. अनकेदा या पुलावरुन धोकादायक प्रवास केला जातो. आता, असाच आणखी एक व्हिडिओ समोर आला आहे. पुलावरून पाणी वाहत असताना नको ते धाडस करत वाहन पाण्यात टाकल्याने दुचाकीस्वार वाहून गेल्याची धक्कादायक घटना गडचिरोलीच्या कुरखेडा तालुक्यातील सती नदी पूलावर घडली. मात्र, नशीब बलवत्तर म्हणून तेथे उपस्थित कामगार आणि पोलिसांना त्या वाहून जाणाऱ्या इसमास वाचवण्यात यश मिळाले. अजय बाळकृष्ण रामटेके, (वय ४० वर्षे), रा. श्रीराम नगर, कुरखेडा असे त्या इसमाचे नाव आहे.

गडचिरोली जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून संततधार >> पान २

## तब्बल दोन वर्षांनी शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी मुहूर्त ठरला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनेच्या 'धनुष्यबाण' या पारंपरिक निवडणूक चिन्हाच्या मालकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात गेल्या दोन वर्षांपासून कोणतीही सूनावणी झालेली नाही. शिवसेना ठाकरे गटाकडून आज सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेपाची मागणी करण्यात आली. यावेळी न्यायालयाने इतकं तातडीचं काय आहे अशी विचारणा केली. यावेळी ठाकरे गटाकडून देवदत्त कामत यांनी लोकांना चिन्ह निवडण्याचा अधिकार असल्याचे सांगितले. यानंतर

### निवडणुकीच्या तोंडावर कोणता निर्णय होणार?

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावर १६ जुलै २०२५ रोजी सुनावणी निश्चित केली आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर या वादाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

जून २०२२ मध्ये शिवसेनेमध्ये मोठी फूट पडली. एकनाथ शिंदेंनी पक्षातील बहुसंख्य आमदार घेऊन वेगळा गट तयार केला आणि उद्धव ठाकरे यांच्या



नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार कोसळले. नंतर निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदेंच्या गटाला 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे मूळ चिन्ह दिले. उद्धव ठाकरे यांना नवा गट नोंदवून 'शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' हे नाव आणि 'मशाल' हे नवे चिन्ह दिले गेले. या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. त्यांचा दावा होता की, पक्षाची मूळ विचारधारा, कार्यपद्धती आणि संस्था रचना त्यांनीच जपली आहे. त्यामुळे चिन्हावर त्यांचा अधिकार आहे. >> पान २

## 'नन्हे फरिश्ते' मुळे फुलले हास्य

घरात भांडण होणे, गर्दीत हरवणे, पुण्या – मुंबईसारख्या मोठ्या शहराचे आकर्षण या आणि अशा अनेक कारणांमुळे राज्यातील अनेक मुले पुण्या – मुंबई सारख्या मोठ्या शहरात दाखल होतात. कुटुंबाशी ताटातूट झालेली ही मुलं पुण्या – मुंबईतील रस्त्यांवर, फुटपाथवर, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॉपवर भटकत असतात. भीक मागून पोटाची खळगी भागवत असतात. यातील काही मुले वाम म र्गाला लागतात तर काही मुले असेच अनाथ म्हणून भटकत असतात. तर काही मुलांना गुंड मवाली जबरदस्तीने भीक मागायला लावतात. त्या मुलांचा गुंड मवाली अतोनात छळ करत असतात. या मुलांना पुन्हा स्वगृही पाठवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने ( आर पी एफ ) नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली. या मोहिमे अंतर्गत एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या कालावधीत मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील वेगवेगळ्या स्थानकांत रेल्वे संरक्षण दलाच्या विशेष पथकाने ( आरपीएफ) २३५ मुलांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही सर्व मुले १२ ते १५ वयोगटातील आहेत. एकट्या पुणे स्थानकात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात ५१ मुलांचा शोध घेऊन रेल्वे सुरक्षा दलाच्या विशेष पथकाने ( आरपीएफ ) या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. विशेष म्हणजे शोधलेल्या या मुलांमध्ये पोलीस ठाण्यात नोंद नसलेलीही काही मुले आहेत. ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम रेल्वे सुरक्षा दलाकडून मागील सात वर्षांपासून राबवण्यात येत आहे. २०१८ मध्ये ऑपरेशन नन्हे फरिश्ते या मोहिमेची सुरुवात झाली. आपल्या आई वडिलांपासून ताटातूट झालेली, घरातून निघून पुण्या – मुंबई सारख्या मोठ्या शहरात पळून आलेली, हरवलेल्या अल्पवयीन मुला मुलींना पुन्हा आपले आई वडील मिळावेत, त्यांना त्यांचे घर पुन्हा मिळावे यासाठी ही मोहीम राबवली जाते. मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दल, रेल्वे पोलीस, रेल्वे कर्मचारी यांच्या सम न्वयातून ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली जाते. या मोहिमे अंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाने रेल्वे डब्यात, रेल्वे स्थानकात किंवा रेल्वेच्या हद्दीत हरवलेल्या किंवा पुण्या – मुंबईत पळून आलेल्या हजारो मुलांची सुटका केली. या मोहिमेमुळे हजारो अल्पवयीन म ुलांच्या व त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून आई वडिलांकडून, कुटुंबापासून दुरावलेली हजारो मुले आपल्या आई वडिलांच्या कुशीत सामावली आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने विशेष आराखडा तयार केला. रेल्वेच्या हद्दीत ज्या ठिकाणी अल्पवयीन मुले मुली भीक म ागत आहेत अशी ठिकाणे पोलिसांनी शोधून काढली. या ठिकाणी पोलिसांनी अतिशय गुप्तपणे कारवाई केली. या मुलांना भीक म ागायला लावणाऱ्या रॅकेटचा शोध घेतला आणि त्यांना अटक करून हजारो मुलांची सुटका केली. मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेऊन या मुलांचे प्रबोधन करण्यात आले. या मुलांच्या पालकांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे मोठे आव्हान रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलिसांसमोर होते. ते आव्हान पोलिसांनी लीलिया पेलले आहे. ही मोहीम अतिशय स्तुत्य आणि अनुकरणीय अशी आहे. ही मोहीम राबवणाऱ्या रेल्वे सुरक्षा दलाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. रेल्वे सुरक्षा दलाने ही मोहीम राबवून हजारो मुलामुलींना अनाथ होण्यापासून आणि वाम मार्गाला लागण्यापासून वाचवले आहे. ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मनापासून धन्यवाद द्यावे लागेल. मुंबई पोलीस दलातर्फे देखील 'ऑपरेशन म ुस्कान' नावाची अशीच एक मोहीम राबविण्यात येते. या मोहीमे अंतर्गत देखील हजारो मुलाम ुलींना त्यांच्या पालकांकडे, कुटुंबाकडे सुपूर्त करण्यात आले आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन मुस्कान या सारख्या मोहिमा फक्त पुण्या – मुंबई पुरत्याच मर्यादित न राहता सर्व महानगरात राबवायला हव्यात म्हणजे बेघर झालेली लाखो मुले स्वगृही परततील आणि स्वगृही परतणाऱ्या या मुलांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल.

# आमदार वानखेडे यांनी अधिवेशनात दिलेला शब्द पाळावा !

## प्रहार जनशक्ती पक्षाची पत्रकार परिषदेतून माहिती

**उमरखेड/प्रतिनिधी :** प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने महाराष्ट्रातील संपूर्ण कॅबिनेट मंत्री तसेच राज्यमंत्री व आमदारांच्या घरासमोर टेंबा आंदोलन करण्यात आले होते . त्यानुसार येथील प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आमदार किसनराव वानखेडे यांच्या घरासमोर दि ११ एप्रील रोजी रात्री १२ वाजताच्या दरम्यान आंदोलन केला .त्याप्रसंगी आमदार वानखेडे यांनी शेतकऱ्यांचा व दिव्यांगाचे प्रश्न येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित करणार असल्याचे आश्वासन दिले होते .

परंतु अधिवेशनाला सुरुवात होऊन तीन दिवस ओलांडले असतानाही शेतकऱ्यांचा व दिव्यांगांचा प्रश्न आमदार वानखेडे यांनी अधिवेशनात मांडला नसल्याने संतप्त प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने दि २ जुलै रोजी येथील स्थानिक विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करून आमदार वानखेडे यांना दिलेल्या आश्वासनाची जाणीव करून दिली . .

पावसाळी अधिवेशनाचा तिसरा दिवस असून अद्यापही आमदार वानखेडे यांनी शेतकऱ्यांचा व दिव्यांगाचा प्रश्न उपस्थित न केल्याने आपण स्वतःला शेतकरी पुत्र म्हणून घेऊ नये तसेच शेतकऱ्यांच्या , दिव्यांकांच्या प्रश्नांची मांडणी अधिवेशनात करू शकत नसाल तर आपण राजीनामा द्यावा असे स्पष्टवक्ती प्रहार चे शहर प्रमुख राहुल मोहितवार यांनी केली .



यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे युवा उपजिल्हाप्रमुख अभिजीत गंधेवार, तालुकाप्रमुख सय्यद माजिद ,शहर सचिव श्याम चेके ,शहर प्रमुख राहुल मोहितवार, रघुनाथ खंडारे, दिव्यांग क्रांती आंदोलनाचे शहर प्रमुख प्रेम रुडे, सिद्धार्थ मुनेश्वर ,भास्कर गंजेवाड दिव्यांग तालुकाप्रमुख बालाजी माने यांची उपस्थिती होती

शहर प्रमुख राहुल मोहितवार यांनी बोलताना भाजपा युतीच्या सरकारने प्रचारात दरम्यान नागरिकांना मोठमोठे वचननामे व जाहीरनामे च्या माध्यमातून मत गोळा करून विजयी झाले परंतु दिलेला शब्द पाळला नसल्याने प्रहार जनशक्ती पक्ष हे आक्रमक होऊन विविध आंदोलने करीत आहेत त्यातच दिनांक ११ एप्रिल रोजी रात्री बारा वाजता च्या दरम्यान आमदार किसन वानखेडे यांच्या निवासस्थानासमोर शेतकऱ्यांना कर्जमाफी व दिव्यांगांना ६०००/– रुपये मानधन मिळावे याविषयी येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात आपण प्रश्न उपस्थित करावे असे सांगितले असता त्या क्षणी आमदार वानखेडे यांनी सदर आंदोलनाला संबोधित करताना नक्कीच शेतकरी व दिव्यांगांचा प्रश्न उपस्थित अधिवेशनात करेल असे आश्वासन दिले होते परंतु अधिवेशन सुरू होऊन तीन दिवस ओलांडले आहे त्यानंतर प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार किसन वानखेडे यांच्याशी संपर्क साधला असता वानखेडे यांनी एवढ्या मोठ्या अधिवेशनात मला बोलायला वेळ दिला नसल्याचे सांगितल्याने प्रहार जनशक्ती पक्षाने आयोजित पत्रकार परिषदेतून आमदार वानखेडे स्वतःला शेतकरी पुत्र म्हणून घेऊ नये जर आपण अधिवेशनात शेतकऱ्यांचा विषय व दिव्यांकांचा विषय मांडू शकत नसाल तर आपल्या आमदारकीचा राजीनामा द्यावे असे ठोकपणे सांगितले ..

तसेच आमदार किसन वानखेडे यांच्यावर हल्लाबोल करीत जर आपणास शेतकऱ्यांची व दिव्यांगांची तसेच मतदार संघातील जनतेची तळमळ असेल तर राजीनामा द्यावा असे आयोजित पत्रकार परिषदेतून सांगितले

तसेच या आंदोलनानंतर राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या निवासस्थानी पुसद येथे प्रहारच्या कार्यकर्त्यांनी घरासमोर रक्तदान आंदोलन केले होते त्यातही त्यांच्याशी बोलताना आमचं रक्त सुद्धा घ्या पण आमच्या दिव्यांगांना मानधन द्या असे म्हणाले होते . तसेच मोहितवार यांनी पुढे बोलताना आपण आदानी व अंबानी यांचं कर्जमाफी करण्यासाठी कोणती समितीची स्थापना करीत नाही परंतु शेतकरी व दिव्यांगासाठीच समितीची स्थापना करण्याची गरज का सरकारला पडते असही बोलले . आमदार ,खासदारांना पगार वाढीची गरज नसतानाही पगार वाढ केली जाते परंतु शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी शासनाकडे अजिबात वेळ नसल्याचे ही सांगितले.

### शेतकरी व दिव्यांगांना सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन

महागाव तालुक्यातील अंबोडा येथे १४ जुलै रोजी शेतकरी ,दिव्यांग व बेरोजगारांसाठी सभेचे आयोजन करण्यात आले आहे त्या सभेसाठी उमरखेड महागाव विधानसभेतील सर्व शेतकरी ,दिव्यांग व बेरोजगार युवकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी प्रहार चे शहर प्रमुख राहुल मोहितवार यांनी केले

## महसूल प्रशासनाच्या पुढाकारातून रस्त्याचे प्रश्न निकाली

### तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व मंडळ अधिकारी जाधव यांचा पुढाकार







**रिसोड/प्रतिनिधी :** शेत रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे पावसाळ्याच्या दिवसात शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. बैलगाडी, ट्रॅक्टर तसेच अन्य वाहने शेतात जावु शकत नव्हती. परिणामी शेतमाल शेतातच पडून राहत होता. अशा अनेक अडचणींचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत होता त्यामुळे शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय येथे अर्ज करून रस्ता मिळावा यासाठी मागणी केली यावर दोन्ही शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन महसूल प्रशासनाने पुढाकार घेतला आणि तीन पैकी दोन रस्ते निकाली काढण्यात आले. आज मोप येथील तीन पैकी दोन रस्ते प्रकरण सामंजस्याने निकाली काढण्यात आले. रिसोड तालुक्यातील मोप येथील जयश्री भीमराव मोरे व इतर १ विरुद्ध अरुण केरू मोरे व गीता दिलीप नरवाडे यांना शेतरस्ते मोकळे करून देण्यात आले आहे. सदर प्रकरणी हे सामंजस्याने हे निकाली काढण्यात आले आहे यावेळी शेतकऱ्यांनी महसूल प्रशासनाविषयी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी मंडळ अधिकारी एस.बी.जाधव, ग्राम महसूल अधिकारी निरफळे, ग्राम महसूल अधिकारी डुकरे व शेतकरी उपस्थित होते.

## कोल्हापुरातील युवा दिग्दर्शकाच्या स्वीट मूनला जर्मनीत सर्वोत्कृष्ट लघुपटाचे मानांकन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीयच नव्हे तर आतरराष्ट्रीय स्तरावरही लक्षवेधी ठरत असलेल्या स्वीट मून या मयूर प्रकाश कुलकर्णीच्या दृश्यकाव्य शैलीत एक वेगळा कलात्मक अनुभव संवेदनशील मनांना देणाऱ्या लघुपटाला जर्मनीमधील स्टुटगार्ट येथे होत असलेल्या २२व्या द इंडियन फिल्म फेस्टिवल ऑफ स्टुटगार्ट मध्ये उत्कृष्ट लघुपटासाठीच्या स्पर्धात्मक विभागात स्थान देण्यात आले आहे. स्टुटगार्ट येथे होणारा महोत्सव हा एक प्रतिष्ठेचा महोत्सव मानला जातो. अशा दर्जेदार चित्रपट–लघुपट महोत्सवात स्वीट मूनला स्पर्धात्मक विभागामध्ये अधिकृतपणे स्थान आणि दिग्दर्शक म्हणून मयूर कुलकर्णी जर्मनीमध्ये महोत्सवास निमंत्रित केले जाणे ही कलापूर कोल्हापूरसाठी एक विशेष सन्मानाची बाब आहे.

कोल्हापुरात बनलेल्या लघुपटाला असा सन्मान प्रथमच लाभला आहे. मयूर कुलकर्णी व्यवसायाने कमर्शियल आर्टिस्ट असला तरी त्याने आतापर्यंत भवताल, ओरिजिन व स्वीट सून असे तीन कलात्मक लघुपट बनवले आहेत आणि तिन्ही लघुपटाना राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर समीक्षकांची चांगली दाद मिळाली आहे. कुलकर्णी यांनी कलामहर्षी बाबुराव पेंटर फिल्म सोसायटीसाठी प्रदीर्घ काळ योगदान करत असल्याने त्यांच्या लघुपटांना मिळणारे यश हे फिल्म सोसायटीसाठी सुद्धा अभिमानास्पद आहे.

अनेक देशात लघुपट प्रदर्शित जर्मनीतील स्टुटगार्ट येथे २३ ते २७ जुलै २०२५ या कालावधित होणाऱ्या महोत्सवात स्पर्धात्मक विभागामध्ये निवडला गेलेला स्वीट मून हा लघुपट या आधी चीन, इंग्लंड, ब्राझिल, पोलंड, पेरू, अझरबैजान, बल्गेरिया, क्कालालामपूर, अथेन्स आदी ठिकाणी प्रदर्शित झाला आहे. अनेक ठिकाणी उत्कृष्ट लघुपट तसेच उत्कृष्ट छायाचित्रणासाठी पुरस्काराचा मानकरी मानकरी ठरला आहे. राष्ट्रीय पातळीवर अनेक महोत्सवात देखील या लघुपटाचा सन्मान झाला आहे. स्टुटगार्ट येथील महोत्सवाच्या स्पर्धात्मक विभागात सन्मानाने स्थान व मयूर कुलकर्णी जर्मनीत येण्याचे निमंत्रण हा आजवरचा सर्व सन्मानापेक्षा मोठा सन्मान आहे. स्वीट मून या १५ मिनिटांच्या लघुपटाचे छायाचित्र संकलन व दिग्दर्शन मयूर कुलकर्णींचं आहे. साऊंड डिझाईन महादेव पाटील यांचे आहे.

# तहसील कार्यालय गुटख्याच्या पिचकारीने रंगले ; कुणी या पिचकारी मारा सर्वत्र घाणीचे साम्राज्य

## तहसीलदारांच्या कक्षा जवळही गुटख्याच्या पिचकाऱ्या

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** येथील तहसील कार्यालयाची इमारत कोट्यावधी रुपयाचा खर्च करून नव्याने उभारण्यात आली आहे. सुसज्ज असलेल्या इमारतीला मात्र, तहसील कार्यालयातील कर्मचारी येणाऱ्या नागरिकांनी गुटख्याच्या पिचकारी मारून सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण केले आहे. विशेष म्हणजे तहसीलदार यांच्या कक्षाच्या बाजुलाच असलेल्या ठिकाणी कर्मचारी नागरिकांनी गुटखा, तंबाखू खाऊन थुंकल्याने तहसील कार्यालय परिसरात सर्वत्र घाण निर्माण केल्याचे दिसून येत आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन तहसील कार्यालयाची स्वच्छता करावी, अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून होत आहे. कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करून मेहकर येथे तहसील कार्यालयाची नवीन इमारत उभारण्यात आली आहे.सदर इमारतीची रंगरंगोटी करून त्याचबरोबर इतर सोयीसुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.मात्र, तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी त्याचबरोबर कार्यालयात येणाऱ्या तालुक्यातील नागरिकांनी तंबाखू गुटखा खाऊन जागोजागी पिचकाऱ्या मारलेल्या आहेत. त्यामुळे तहसील कार्यालय हे सर्वत्र घाणीने माखले असल्याचे चित्र दिसून येत आहे.विशेष म्हणजे तहसीलदार यांच्या कक्षाच्या बाजुलाच सुद्धा गुटख्याच्या पिचकाऱ्या मारलेल्या असल्याने तहसील प्रशासना कार्यालयात प्रशासनाचा कोणताही वचक नसल्याचे दिसून येत आहे. तहसील कार्यालयात सर्वात गुटखा खाऊन थुंकल्या जात आहे. जागोजागी तंबाखू खाऊन घाण केलेली असल्याचे चित्र तहसील कार्यालयात व परिसरात दिसून येत आहे. याकडे संबंधीत वरिष्ठांनी लक्ष देऊन गुटखा खाऊन पिचकारी मारणाऱ्या अधिकारी, कर्मचारी व नागरिकांवर दंडात्मक कारवाई करून तहसील कार्यालयाचे स्वच्छता करावी व पुन्हा असा प्रकार होणार नाही, यासाठी दंडात्मक कारवाई करावी.अशी मागणी तज्ञ नागरिकांकडून होत आहे.






### तहसीलदार यांच्या कक्षाच्या बाजुलाच घाणीचे साम्राज्य

तहसीलदार यांच्या कक्षाच्या बाजुलाच गुटखा, तंबाखू खाऊन थुंकले जात असल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. येता जाताना हा प्रकार तहसीलदार यांच्या लक्षात येत नाही का असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याचबरोबर तहसीलदार यांचे याकडे दुर्लक्ष असल्याने गुटखा खाऊ घाण करण्याचा प्रकार सुरू असल्याचा असल्याचे दिसून येत आहे. तहसीलदार यांनी याकडे लक्ष देऊन तहसील कार्यालयाची स्वच्छता करण्याची निर्देश द्यावे त्याचबरोबर तहसील कार्यालयाच्या परिसरात गुटखा तंबाखू खाणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. अशी मागणी स्वच्छता प्रेमी तथा सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## पान १ वरून..

### अखेर मंत्र्यांना मर्जीतले

महायुतीतील सात मंत्र्यांना अद्याप खासगी सचिव मिळाले नाहीत. अनेक मंत्र्यांकडे मुख्यमंत्री कार्यालयाची परवानगी नसताना खासगी सचिव आणि विशेष कार्यकारी अधिकारी कार्यरत आहेत. सामान्य प्रशासन विभागाने या अधिकाऱ्यांना नोटीस पाठवली असून आठ दिवसांत उत्तर देण्यास सांगितले होते. उद्योगमंत्री उदय सामंत, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांसह एकूण सात मंत्र्यांना खासगी सचिव नेमण्यात आलेले नाहीत.

### गुन्हेगारांविरोधात जलद

करण्यात येणाऱ्या चाचण्या वेळेत कराव्यात. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रिक्त पदे भरली असून आणखी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास मागणी करावी. सुविधा व नागरिक केंद्रित सेवा यामध्ये महाराष्ट्र देशात आघाडीवर आघाडीवर असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पोलिस दलाच्या सक्षमीकरणासाठी राज्यातील पोलीस अधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षणांचे नियमित अंतराने आयोजन करण्यात यावे. मास्टर ट्रेनर्स तयार करून न्यायालयीन अधिकारी, कारागृह कर्मचारी, फॉरेन्सिक वकिलांसाठीही प्रशिक्षण देण्यात यावे. ऑनलाईन 'एफआयआर' प्रणालीवर नागरिक सहजपणे तक्रार नोंदवू शकतील याबाबत काम करावे. ई साक्ष ॲप, सीसीटीएनएस प्रणाली याचा उपयोग वाढविण्यात यावा. गुन्हे सिद्धता वाढण्यासाठी ई न्यायालय प्रणाली सक्षम करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. महिलांसंदर्भातील गुन्ह्यांचा तपास जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करावी. विशेषतः छेडछाड व अत्याचाराच्या प्रकरणांचा तपास जलदगतीने पूर्ण करावा. आरोपपत्र लवकर दाखल करण्यासाठी कार्यवाही होणे गरजेचे आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. बैठकीस मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. इकबाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) राधिका रस्तोगी, प्रधान सचिव (कायदा व सुव्यवस्था) अनुप कुमार सिंह, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, महासंचालक (न्यायवैद्यक) संजय कुमार वर्मा, अपर पोलीस महासंचालक (कारागृह) सुहास वारके यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### पुढील शंभर वर्षांचा

यावेळी भारतीय नौदलातून निवृत्त आयएनएस गुलदार जहाजाचा उपयोग करुन सिंधुदुर्ग जिल्ह्यानजिक समुद्रात कृत्रिम प्रवाळ निर्माण करुन तिथे जागतिक दर्जाचे स्कुबा डायव्हिंग, पाणबुडीचा अनुभव, समुद्रात पाण्याखाली संग्रहालय आदी पर्यटन सुविधांची निर्मिती, नवी मुंबईत उलवे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळानजिक युनिटी मॉलची उभारणी, नाशिक येथे 'राम-काल-पथ' ची निर्मिती आणि विकास, राज्यातील ठाणे, नागपूर, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, पिंपरी चिंचवड, कल्याण-डोंबिवली, सोलापूर या सात ठिकाणी नोकरदार महिलांसाठी वसतीगृहांची उभारणी, नगरविकास, ग्रामविकास, आपत्ती व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य आदी विभागांशी संबंधित विविध प्रकल्प आणि विकास योजना, सांस्कृतिक वारसा जतन, वने आणि वन्यजीव व्यवस्थापन, रेवस-रेडी सागरी महामार्ग, पोलिसांसाठी गृहनिर्माण योजना आदी कामांची प्रगती, त्यासाठी निधीची उपलब्धता यासारख्या बाबींचा आढावा घेऊन ही कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. ही कामे पूर्ण होण्यातील अडथळे दूर करण्यासाठी शासनाकडून संपूर्ण सहकार्य मिळेल. मात्र कामे वेळेत पूर्ण झालीच पाहिजेत. ती दर्जेदार असली पाहिजेत, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत सांगितले. त्याअनुषंगाने सूचनाही केल्या. पंधराव्या वित्त आयोगातून होणारी ही सर्व विकासकामे नियोजित वेळेत पूर्ण व्हावीत, सर्व कामे दर्जेदार असतील याची काळजी घ्यावी. केंद्र सरकारशी समन्वय, संपर्क ठेवून पंधराव्या वित्त आयोगाचा सर्व निधी चालू आर्थिक वर्षअखेर खर्च होईल, यादृष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज (२ जुलै) झालेल्या बैठकीला अर्थ विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, ग्रामविकासचे प्रधान सचिव एकनाथ डवले, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, नगरविकासचे प्रधान सचिव डॉ. के.एच. गोविंदराज, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा) सचिव शैला ए., सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव विरेंद्र सिंह, नाशिकच्या महापालिका आयुक्त मनीषा खत्री, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### नशिब बलवत्तर म्हणून

पाऊस सुरू आहे, त्यामुळे अनेक नदी नाल्यांना पूर आला आहे. सती नदीच्या पूलावरुनही पाणी वाहत असताना अजय रामटेके या दुचाकीस्वाराने धाडस करत वाहन पाण्यात टाकले. मात्र, काही क्षणातच ते वाहून गेले. त्यावेळी पुलावर बंदोबस्तासाठी असलेल्या पोलीस जवान आणि कामगारांनी दोरीच्या सहाय्याने वाहून जाणाऱ्या अजय रामटेके यांना वाचवले. कामगारांनी नदीत उतरुन त्यांना वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, या घटनेचा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामुळे पुलावरून पाणी वाहत असताना नको ते धाडस करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### तब्बल दोन वर्षांनी

उद्धव ठाकरे गटाचे वकील कपिल सिब्बल यांनी मे २०२५ मध्ये कोर्टात अर्ज दाखल करून त्वरीत सुनावणीची मागणी केली होती. परंतु, कोर्ट सुट्टीमुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली. आता कोर्टाने १४ जुलै २०२५ रोजी या प्रकरणावर सुनावणी ठेवली आहे. याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद आहे की, चिन्ह फक्त बहुमताच्या आधारावर नव्हे तर पक्षाची मूळ ओळख, विचारधारा आणि ऐतिहासिक भूमिका पाहून दिले पाहिजे. त्यांच्या मते, निवडणूक आयोगाचा निर्णय चुकीचा आहे. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीत अंतरिम आदेश देत दोन्ही गटांना स्वतंत्र चिन्ह दिले होते. तसेच आदेश या प्रकरणात का देत नाही, असा सवालही त्यांनी केला आहे. मुंबई, पुणे, नागपूरसह राज्यातील २७ महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर होणार असून प्रचाराच्या तयारीला वेग आला आहे. उद्धव ठाकरे गट आणि शिंदे गट दोघेही स्वतंत्र चिन्हांवर निवडणूक लढवणार आहेत. मात्र अंतिम निकालावर चिन्ह बदलल्यास जनतेमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. त्यामुळे ठाकरे गट सर्वोच्च न्यायालयाकडे अंतरिम आदेशाची मागणी करत आहे.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज

## उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले

दैनिक आपला विदर्भ





**पंढरपूर/प्रतिनिधी :** आषाढी शुद्ध एकादशी ०६ जुलै २०२५ रोजी असून, या आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली.

आषाढी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी ८ हजार ११७ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, चार अप्पर पोलीस अधिक्षक, २४ पोलीस उपअधिक्षक, ७६ पोलीस निरिक्षिक, ३१२ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ४ हजार ८५० पोलीस अंमलदार व २ हजार ८५० होमगार्ड तसेच ०५ एसआरपीएफ कंपनी, ७ बीडीएस पथके, आरसीपी दोन पथके,

- ✻ ८ हजार ११७ पोलीस अधिकारी व कर्मचारी
- ✻ ९ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र
- ✻ आपतकालिन परिस्थिती हातळण्यासाठी १४ प्रशिक्षित कार्ट पथके
- ✻ १० ठिकाणी होडी नियंत्रक पथकाची स्थापना

क्युआरटी चार पथके, आपत्कालिन परिस्थिती हातळण्यासाठी प्रशिक्षित १४ कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने १० ठिकाणी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी १२ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच सुमारे ३०० सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण आदी ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे . तसेच वाहतुक नियमनासाठी १४ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १७ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.भोसले यांनी केले आहे.

# हरदडा येथील कुटुंबाचा प्रामाणिकपणा; मुलीच्या लग्नाचा हरवलेला बस्ता केला परत

## व्हाट्सॲप चा सदुपयोग आला कामी



दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** लग्नाचे सगळे तयारीत असताना जेव्हा त्यांच्या मुलीच्या लग्नाचा सर्व महत्वाचा बस्ता तो रस्त्यात हरवला परंतु व्हाट्सॲप सोशल मीडियाचा सकारात्मक उपयोग केल्याने तो बस्ता परत मिळण्यास मदत झाली असून सापडलेला बस्ता परत करत हरदडा येथील श्रीरंग तुकाराम पायगन व प्रफुल पंडित पायगन या कुटुंबाने आपल्या प्रामाणिकतेचा परिचय देत तब्बल ३० ते ४० हजार रुपयाचा बस्ता परत केला आहे.


ढाणकी येथील शिवकुमार हुडगे हे मुलीच्या लग्नाचा बस्ता खरेदी करून चारचाकी वाहनाने हदगाव ते ढाणकी रस्त्याने येत असताना मध्यरात्री बारा वाजताच्या सुमारास चारचाकी वाहनाच्या टपावरून बस्त्याचा गट्टा रस्त्यात पडला ढाणकी येथे घरी आल्यानंतर ही बाब त्यांच्या लक्षात आली रात्रीलाच परत जावून त्यांनी या रस्त्याने शोध घेण्याचा प्रयत्न केला परंतु बस्त्याचा गट्टा सापडला नाही मुलीचे लग्न अवघ्या सात दिवसावर येऊन ठेपले होते वेळेवरच बस्ता हरवल्याने मुलीच्या कुटुंबाची चिंता वाढली होती.

अशातच पत्रकार नागेश महाजन यांनी मुलीच्या लग्नाचा बस्ता हरवल्याची सविस्तर पोस्ट व्हाट्सअप सोशल मीडियावर प्रसिद्ध केली त्यांच्या ढाणकी येथील पत्रकार मित्रांनी तसेच इतरांनी देखील ही पोस्ट लगेच इतर ग्रुपवर फॉरवर्ड केली अशातच स्वप्निल चिकाटे, ओम खोपे व हरदडा येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रणिथा कांबळे यांनी तुमचा बस्ता सुरक्षित असून हरदडा येथील पायगन कुटुंब तो बस्ता खात्री करून ज्याचा आहे त्याला परत द्यायला तयार आहे असे कळविले त्यानंतर खात्री करून पायगन कुटुंबांनी आपल्या प्रामाणिकतेचा परिचय देत हा बस्ता सुरक्षितपणे मुलीच्या कुटुंबाला परत केला यावेळी सामाजिक कार्यकर्त्या प्रणिथा कांबळे, ओम खोपे, धीरज वानखेडे, श्रीरंग पायगन, तुकाराम पायगन, प्रफुल पायगन, नागेश महाजन, शिवकुमार हुडगे, माधवी हुडगे, हरी, विनोद हुडगे व हरदडा येथील नागरिक उपस्थित होते.

सामाजिक माध्यमांचा उपयोग केवळ अफवा पसरवण्यासाठी नव्हे, तर समाजहितासाठी आणि इतरांना मदत करण्यासाठी देखील केला जावू शकतो व यातून अनेक अडचणी सुटू शकतात.

# खेलो इंडिया मध्ये बुलडाण्याची प्रांजल चमकली

## शिवसेना प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी केला सन्मान




दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** दिल्ली येथे पार पडलेल्या ''खेलो इंडिया'' १७ वर्षांखालील राष्ट्रीय महिला तिरंदाजी स्पर्धेत बुलडाणा जिल्ह्यातील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय प्रांजल प्रविण नरवडे हिने सब ज्युनियर रिकर्व्ह गटात तृतीय क्रमांक पटकावून ब्राँझ पदकाची मानकरी ठरली. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या ॲड. जयश्री शेळके यांनी प्रांजलच्या घरी भेट देऊन तिच्या कुटुंबीयांसोबत तिचा सत्कार केला.

या प्रसंगी ॲड. जयश्री शेळके म्हणाल्या, ''प्रांजलने खेळातील आपली निष्ठा, अपार मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश मिळवले आहे. सततचा सराव, कठोर परिश्रम, आणि शिस्तीच्या जोरावर तिने बुलडाणा जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे. तिच्या यशामागे तिच्या कुटुंबियांचे नैतिक पाठबळ, त्यांचा त्याग आणि मानसिक आधार हे मोठे कारण आहे. घरातील सर्वांनीच तिला प्रोत्साहन दिले, म्हणूनच प्रांजल आज या शिखरावर पोहोचली आहे. अशा उभरत्या खेळाडूंच्या पाठीशी उभे राहणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.''

तिने खेळासाठी शाळेचा वेळ, सुट्ट्या, अनेक खाजगी क्षण बाजूला ठेवत अखंड परिश्रम घेतले, हे देखील त्यांनी आवर्जून नमूद केले. याप्रसंगी राजर्षी शाहू ग्रामीण पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब शेळके, प्रांजलचे वडील डॉ.प्रविण नरवडे, आई डॉ.विजया नरवडे तसेच इतर कुटुंबीय, मित्रपरिवार उपस्थित होते. प्रांजलच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यात तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रुग्णांना अधिक चांगली सेवा देण्यावर मनपा आरोग्य केंद्रांचा असणार भर : आयुक्त विपीन पालीवाल

## ➤ राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकानुसार करणार आरोग्य सेवा

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** नागरिकांना चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी मनपा रुग्णालयांच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. त्यातही स्वच्छता, रुग्णाचे समाधान यावर अधिक भर दिला जात आहे. एनक्यूएएस मानांकनासाठी आवश्यक त्या सर्व सेवा उपलब्ध करून देण्याचे मनपाचे ध्येय असल्याचे आयुक्त विपीन पालीवाल यांनी राष्ट्रीय डॉक्टर्स डे कार्यक्रमात संबोधित करतांना सांगितले.

चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने डॉक्टर्स डे निमित्त मनपाच्या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मनपा आरोग्य केंद्रांच्या सेवा या एनक्यूएएस म्हणजे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकानुसार कश्या करता येतील यावर चर्चा करण्यात आली. एनक्यूएएस ही मानके आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी तयार केली आहेत.

एनक्यूएएसचा मुख्य उद्देश सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये आरोग्य सेवांची गुणवत्ता सुधारणे हा आहे. एनक्यूएएसमध्ये सेवा तरतूद, स्वच्छता,रुग्णांचे अधिकार, इनपुट, रुग्णांचे समाधान, रुग्णांना दिली जाणारी सेवा,सहाय्यक सेवा, क्लिनिकल काळजी, संसर्ग नियंत्रण आणि गुणवत्ता व्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांसाठी मानके निश्चित केलेली आहेत.






आरोग्य सुविधा या मानकांनुसार काम करत आहेत की नाही हे तपासण्यासाठी त्यांचे मूल्यांकन केले जाते. जर त्यांनी चांगले काम केले, तर त्यांना एनक्यूएएस प्रमाणपत्र दिले जाते.शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राला एनक्यूएएस प्रमाणपत्र मिळाल्यास, त्यांना शासनाकडून अधिक निधी मिळतो. एनक्यूएएसच्या निकषांमुळे आरोग्य सेवांची गुणवत्ता सुधारते, रुग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळते, आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा होतात, आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये कामाचा उत्साह वाढतो.

त्यामुळे यापुढे मनपाची ७ प्रा. आरोग्य केंद्रे व २१ आरोग्यवर्धिनी केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांद्वारे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकानुसार सुविधा व सेवा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.याप्रसंगी उपायुक्त संदीप चिद्रवार,मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नयना उत्तरवार, डॉ.अश्विनी भारत,डॉ. जयश्री वाडे,डॉ.योगेश्वरी गाडगे,डॉ. अर्वा लाहिरी,डॉ.शरयु गावंडे,डॉ. अल्फीया खान,डॉ.नेहा वैद्य व वैद्यकीय अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.

# जिल्हा परिषदेत 'कृषी दिन' उत्साहात साजरा

## – कै. वसंतराव नाईक यांना जयंतीदिनी अभिवादन – प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी विभागाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या श्री. शिवाजी सभागृह येथे आयोजित कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील होते. या कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, जिल्हा व्यवस्थापक महाबिज अशोक ठाकरे, आयोजक पुरुषोत्तम अनगाईत व जिल्हा कृषी अधिकारी दिनकर मेरत आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी शेतकऱ्यांना शेतीत नफा वाढवण्यासाठी बीजोत्पादन, सामूहिक शेती, उत्पादक कंपनी, फळबाग लागवड यांसारख्या उपक्रमांचे महत्त्व पटवून दिले. तसेच शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा () वापर कसा करता येईल हे समजावले.

कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ अमोल झापे यांनी जमिनीच्या सुपीकतेचे संवर्धन व उत्पादन क्षमता वाढीबाबत मार्गदर्शन केले. आत्माचे प्रकल्प संचालक, पुरुषोत्तम उन्हाळे, यांनी प्रक्रिया उद्योग व सामूहिक विक्री व्यवस्थेबाबत माहिती दिली. श्रीमती शारदा कोकाटे, प्रगतिशील महिला शेतकरी यांनी आधुनिक शेती व पूरक व्यवसायांबाबत अनुभव सांगितला. प्रितेश डहाके यांनी शेती पिकांसाठी योग्य बाजारपेठ निवडीचे महत्त्व सांगितले.

प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव

जिल्ह्यात शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १० प्रगतिशील महिला शेतकरी व १३ प्रगतिशील पुरुष शेतकऱ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. रुख्मीणा मधुकर उमाळे, रा. बेलुरा, ता. शेगाव यांना 'राष्ट्रमाता जिजाऊ प्रगतिशील महिला शेतकरी सन्मान पुरस्कार' व प्रितेश विजयराव डहाके, रा. डोणगाव, ता. मेहकर यांना 'कै. वसंतराव नाईक प्रगतिशील शेतकरी सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला. दोघांनाही रोख ११ हजार रुपयाचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिवंगत वसंतराव नाईक व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी प्रास्ताविक करून दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्याची व कृषी विभागाच्या योजनांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर जोशी यांनी तर आयोजन कृषी विभागाच्या चमूने केले. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी उपस्थित राहून या कार्यक्रमात सहभाग घेतला.

## विविध वृत्त...

### केंद्रीय राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव हे गुरुवारी दि. ३ जुलै रोजी खामगांव जि. बुलढाणा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार सकाळी ११ वाजता खामगांव रेल्वे स्थानक येथे विठ्ठल रुख्मिणी दर्शन एक्सप्रेसने पंढरपुरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या स्वागतासाठी उपस्थिती, त्यानंतर सोयीनुसार मातोश्री, शिवाजी नगर, मेहकरकडे प्रस्थान करतील.

### तेरवी न करता वृद्धाश्रम आणि गौरक्षण येथे दान ; रत्नपारखी परिवाराचा स्तुत्य उपक्रम





**दैनिक आपला विदर्भ**

**दिग्रस/प्रतिनिधी :** दिग्रस येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक केतन रत्नपारखी यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुखद निधन झाले. त्याची तेरवी दि. २८ जून रोजी होती. ही तेरावी न करता तेरवीच्या खर्चात गौरक्षण आणि वृद्धाश्रमात केतनच्या नावाने दान देऊन रत्नपारखी परिवाराने स्तुत्य उपक्रम राबविला.नेहमी गोरगरीब, दुखी-कष्टी, रुग्ण, वृद्ध व रंजल्या गांजल्याच्या सेवेत तत्पर असलेले माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते स्व. केतन रत्नपारखी यांचा वारसा पुढे चालवत त्यांच्या परिवाराने त्यांच्या तेरवीचा नेम टाळून दोला महाराज वृद्धाश्रम, उमरी पठार येथील वृद्धाश्रमात वृद्धांना अन्नदान केले. गौसेवक म्हणूनही स्व.केतन रत्नपारखी यांची ख्याती होती. त्याची गो सेवा पुढे चालावी यासाठी गौरक्षण येथे सुद्धा गोमातेला ढेप, चारा दान केले. यावेळी केतनच्या परिवारातील सर्व सदस्य तसेच आप्तेष्ट मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### रणबीर कपूर स्टारर 'रामायण'च्या चित्रपटाचा फर्स्ट लूक ९ शहरांमध्ये लॉन्च होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक असलेल्या 'रामायण'बद्दल आता एक अपडेट समोर आली आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित आणि रणबीर कपूर, साई पल्लवी आणि यश अभिनीत चित्रपटाची पहिली ३ मिनिटांची झलक काही खास लोकांसाठी प्रदर्शित करण्यात आली. आता हीच झलक चित्रपटाचे निर्माते प्रेक्षकांसाठी लवकरत शेअर करणार आहे. 'रामायण'ची पहिली झलक कधी येणार याबद्दल आता आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. चित्रपट समीक्षक तरण आदर्श, ज्यांना पहिल्या झलकचा तसेच ७ मिनिटांच्या स्पेशल विजन शोरीलचा एक्सक्लूसिव प्रीव्यू मिळाला आहे, ते आता त्यांचा उत्साह थांबवू शकले नाहीत. त्यांनी सोशल मीडियावर लिहिलं, 'जय श्री राम... बहुप्रतीक्षित महाकाव्य 'रामायणा'ची पहिली झलक आणि ७ मिनिटांच्या स्पेशल विजन शोरील नुकताच पाहिला. त्याची झलक खूपच रोमांचक आहे.

# पेनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे रस्ता गेला वाहून




**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** पेनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे रस्ता गेला वाहून शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांचे हाल रिसोड रिसोड तालुक्यातील मसला पेन ते पेनबोरी पांदण रस्ता पेनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे पूर्णतः खराब झाला आहे त्यामुळे शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागत आहे यासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी तहसीलदार रिसोड यांना निवेदन देऊन झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून नवीन रस्ता करून द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे सदर रस्त्याचा अहवाल ग्राम महसूल अधिकारी यांनी तहसीलदार यांच्याकडे सुपूर्त केला आहे त्यामुळे लवकरात लवकर शेतकऱ्यांसाठी रस्त्याचा प्रश्न निकाली काढावा असे निवेदन मसला पेन येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात केले आहे.

## कृष्णा आंधळेला तात्काळ अटक करा अन्यथा...; धनंजय देशमुखांचा आक्रमक पवित्रा, म्हणाले, मी कठोर निर्णय घेण्याच्या तयारीत!

**मुंबई/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणाला ६ महिने उलटून गेले.मात्र अद्याप या प्रकरणातला एक आरोपी कृष्णा आंधळे हा फरार आहे. त्याला तात्काळ अटक करा त्याच्यापासून आमच्या जीवितास धोका आहे त्याला अटक न केल्यास मी लवकरच कठोर निर्णय घेणार असल्याचं धनंजय देशमुख यांनी आज जाहीर केलंय. बीडमध्ये सुनावणीच्या दिवशी न्यायालयाच्या परिसरात आरोपींचे समर्थक आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी हे पक्ष चिन्ह असलेल्या गाड्या मोठ्या संख्येने आणून वातावरण भयभीत करून कुटुंबावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. वेळोवेळी मागणी करून देखील सर्व आरोपी एकाच जेलमध्ये आहेत त्यांना वेगवेगळ्या जेलमध्ये पाठवावं. असं न झाल्यास मी कठोर निर्णय घेणार असून त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल असा इशारा धनंजय देशमुख यांनी दिलाय.

९ डिसेंबर २०२४ रोजी बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेनंतर वाल्मिक कराडसह इतर आरोपी मकोका अंतर्गत अटकेत आहेत. या प्रकरणाला सहा महिने पूर्ण झाले असून अजूनही कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे.

## आषाढी एकादशी साठी विठुरायांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांच्या स्वागतासाठी उपस्थित राहणार केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

**दैनिक आपला विदर्भ**

**खामगावातून सुटणाऱ्या विशेष विठ्ठलदर्शन रेल्वे गाडीला दाखवणार हिरवी झेंडी**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आषाढी एकादशी निमित्य विठूरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या वारकऱ्यांच्या स्वागतासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव ३ जुलैला खामगाव येथील रेल्वे स्थानकावर उपस्थित राहून विठ्ठल दर्शन रेल्वे गाडीला हिरवी झेंडी दाखवणार आहे.

दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरच्या विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील विठ्ठलभक्त पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत असतात विठ्ठल भक्तांचा प्रवास सोईचा व्हावा या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या मदतीने दरवर्षी खामगाव रेल्वे स्थानकातून विठ्ठल दर्शन एक्सप्रेस ही रेल्वे गाडी सोडण्यात येते. या विठ्ठलदर्शन एक्सप्रेसची पहिली फेरी आज दिनांक ३ जुलै रोजी पंढरपूरच्या दिशेने रवाना होणार आहे. विठुरायाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या विठ्ठल भक्तांच्या स्वागतासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे खामगाव येथील रेल्वे स्थानकावर सकाळी ११ वाजता उपस्थित राहणार आहेत त्यानंतर मंत्री महोदयांच्या हस्ते विठ्ठल दर्शन रेल्वे गाडीला हिरवी झेंडी दाखविल्या जणार आहे त्यानंतर हि गाडी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्त होणार आहे . यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शांताराम दाणे उपजिल्हाप्रमुख संजय अवताडे राजेश मिरगे तालुकाप्रमुख राजु बघे , रामा थारकर शिवसेनेचे पदाधिकारी, वारकरी, आणि नागरिक उपस्थित राहणार आहेत.



## गुरांना टॅग (बिल्ला) लावण्याची बजरंग दल संयोजक कृष्णा बकाल यांची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**



**डोणगाव/प्रतिनिधी :** गुरांची होणारी तस्करी थांबविण्यासाठी गुरांना टॅग (बिल्ला) मारण्यात यावा, अशी मागणी डोणगाव येथील बजरंग दलाचे तालुका संयोजक कृष्णा रमेश बकाल यांनी डोणगाव येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमुद केले आहे की, काही दिवसांपासून गोवंशाची तस्करी व कत्तलीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

सदर जनावरणे कोणाची आहेत हे जाणून घेण्यासाठी सर्व गुरांना टॅग (बिल्ला) लावणे अनिवार्य करणे गरजेचे आहे. जेणेकरून कुणाची गुरे चोरीला किंवा कत्तलीसाठी जातात हे आपल्या लक्षात येईल, मी स्वत: तस्करीसाठी जाणारे गुरे डोणगाव परिसरात पकडले आहेत. परंतु,सदर जनावरे कोणाची आहेत. हे कळू शकले नाहीत. त्यामुळे गुरांना टॅग (बिल्ला) असणे अत्यंत गरजेचे आहे. टॅग (बिल्ला) असल्यामुळे चोरीला किंवा कत्तलीसाठी जाणारी गुरे हे त्या मालकाला परत मिळू शकतात. त्यामुळे गुरांना टॅग (बिल्ला) लावण्यात यावा, अशी मागणी पशूवैद्यकीय अधिकारी यांना २ जुलै रोजी निवेदनाद्वारे डोणगाव येथील बजरंग दलाचे संयोजक कृष्णा रमेश बकाल यांनी केली आहे. निवेदनावर अक्षय आखाडे, दिपक इंगळे, प्रसाद अंबेकर, विजय भंडारे, राम फिरके, नोश परमाळे, सागर ताढे, ओम जाधव, राहुल अरक, पवन वाणी, तुषार आखाडे, अतुल आखाडे, विशाल पांडव, विशाल दांदडे, अभि दिनारे, सागर सोळंके, अरुण जाधव, सुनिल बाकल, राहुल देशमुख, चेतन कानोडजे, प्रकाश इंगळे, आकाश रोटे, मयूर पांडव, सागर आनूकर, रॅंजिश खंडारे, पवन महापुरे, मोहन आखाडे,सागर सुर्यवंशी, पवन निकस, मयूर पवार यांच्या स्वाक्षया आहेत.

# "मॉडेल सोलर व्हिलेज" साठी जिल्ह्यात १५ गावात होणार स्पर्धा : जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**१ कोटी रूपयाचे केंद्रीय अर्थ सहाय्य मिळणार**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेअंतर्गत शंभर टक्के सौर प्रकल्प स्थापन करण्यात आलेल्या गावांमधून स्पर्धात्मक पध्दतिने एका "मॉडेल सोलर व्हिलेज" ची निवड करण्यात येणार आहे.निवड करण्यात आलेल्या या मॉडेल सोलार व्हिलेजला केंद्रशासनाचे १ कोटी रूपयाचे अर्थसहाय्य मिळणार आहे. जिल्ह्यातील १५ महसूली गावात ही स्पर्धा होणार असून या स्पर्धे तून एक "मॉडेल सोलर व्हिलेज" निवडण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दिली.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय समितीतील सदस्य,अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके आणि "मॉडेल सोलर व्हिलेजच्या" स्पर्धेसाठी पात्र जिल्ह्यातील ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या १५ महसूली गावातील सरपंच/सचिव यांच्याशी सविस्तर चर्चा करून स्पर्धेला (दि.१९ जून) प्रत्यक्ष सुरूवात करण्यात आली असून, स्पर्धेचा कालावधी पुढील सहा महिने राहणार आहे. निवडीसाठी जिल्हास्तरीय समितीव्दारे सहा महिन्यांनी स्पर्धेतील गावांची एकूण वितरित अक्षय ऊर्जा () क्षमतेवर मूल्यांकन केले जाणार आहे आणि सर्वाधिक आरई क्षमता असलेल्या गावाची मॉडेल सोलर व्हिलेज म्हणून निवड केली जाणार आहे.




स्पर्धेत सहभागी झालेल्या गावातील सरपंच तसेच सचिव यांनी गावात मॉडेल सोलर व्हिलेज बाबत जनजागृती करावी,लोकांना माहिती देऊन सौर ऊर्जा आपल्या घराच्या छतावर बसविण्यासाठी प्रेरीत करावे. तसेच सौरऊर्जेचे फायदे सांगून सौल ऊर्जा स्थापित करण्याकरीता बँकेमार्फत कर्ज मिळणाऱ्या योजना,तसेच केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या योजनांच्या बाबतीत मार्गदर्शन तसेच सहकार्य करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

"मॉडेल सोलर व्हिलेज" स्पर्धेत निवड झालेल्या १५ गावात ही स्पर्धा होणार आहे. या गावामध्ये प्रामुख्याने मोताळा तालुक्यातील धाननगाव बडे,सिंदखेड राजा तालुक्यातील शेंदुर्जन,देऊळगाव राजा तालुक्यातील देऊळगाव मही,बुलडाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई, कोलवड,साखळी बु.,डोंगरखंडाळा,सागवण, जांब,धाड ,सावळा सुंदरखेड,मेहकर तालुक्यातील जानेफळ,डोणगाव,लोणार तालुक्यातील किनगाव आणि खामगाव तालुक्यातील सुटाळा या गावाचा समावेश आहे.